# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

टेबल क्रः- १२      पेपर कात्रण      दिनांक :- १०/१२/२०२२

-----------------oooooo------------------

### विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस आयुक्त यांचा शेराः-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेराः-

३) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेराः-

CamScanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- १०/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

२)

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १०/१२/२०२२ | म.टा. पान क्र. ७ | चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्याने वादंग | इतर | |
| २. | १०/१२/२०२२ | लोकमत पान क्र. २ | हवालदार पदासाठी तृतीयपंथीही पात्र | इतर | |
| ३. | १०/१२/२०२२ | लोकसत्ता पान क्र. १० | श्रद्धाच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या | तुळींज/ माणिकपुर | |
| ४. | १०/१२/२०२२ | पुढारी पु. पान क्र. १ | ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी | वसई विरार | |
| ५. | १०/१२/२०२२ | पुढारी पान क्र. ३ | वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या आरोपीस अटक | अर्नाळा | |
| ६. | १०/१२/२०२२ | पुढारी पु. पान क्र. २ | कर्ज देण्याच्या अमिषाने दीड लाखांची फसवणूक | नवघर | |
| ७. | १०/१२/२०२२ | लोकसत्ता पान क्र. १६ | बुलेट ट्रेन प्रकल्पातील वृक्षतोडीला विरोध | वसई विरार | |
| ८. | १०/१२/२०२२ | पुढारी पु. पान क्र. २ | पोलीस आयुक्तांसह पुरातत्व विभागाच्या संचालकांना समन्स | उत्तन | |
| ९. | १०/१२/२०२२ | पुढारी पु. पान क्र. २ | घरफोडी करणाऱ्या महिलेस अटक | आचोळा | |

CamScanner

1) म. टा. पान क्र. 7 दि. 10/12/2022

# चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्याने वादंग

## 'फुले, आंबेडकर, कर्मवीर यांनी शाळांसाठी भीक मागितली'

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद/मुंबई**

'महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाळा सुरू केल्या तेव्हा सरकारने त्यांना अनुदान दिले नव्हते; त्यांनी लोकांकडे भीक मागितली', असे विधान उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी केल्याने वादंग निर्माण झाला. त्यानंतर, 'माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला', अशी भूमिका पाटील यांनी मांडली.

औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पैठण येथील संतपीठाचे प्रमाणपत्र वितरण उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. 'शिक्षणसंस्था सुरू करताना निधीसाठी सरकारवर अवलंबून राहू नका. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाळा सुरू केल्या. शाळा सुरू करताना त्यांना सरकारने अनुदान दिले नाही. त्यांनी लोकांकडे भीक मागितली', असे वक्तव्य पाटील यांनी या कार्यक्रमात केले.



**"महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भाऊराव पाटील यांनी शाळा सुरू केल्या तेव्हा सरकारने अनुदान दिले नव्हते; त्यांनी लोकांकडे भीक मागितली.**

**– चंद्रकांत पाटील**

त्यांच्या या वक्तव्याचे तीव्र पडसाद उमटले. पाटील यांच्या औरंगाबाद येथील नियोजित दौऱ्याच्या मार्गावर आंदोलन करण्यात आले. रिपब्लिकन सेनेने औरंगपुरा येथे जोरदार निदर्शने केली. दरम्यान, 'माझ्या भाषणाचा विपर्यास करण्यात आला आहे. माझे संदर्भ आणि बोलणे चूक नव्हते', असे चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले. एका कार्यक्रमासाठी भेटले असता त्यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना भाषणाचा व्हीडिओ दाखवीत आपले म्हणणे मांडले. यावेळी सहकारमंत्री अतुल सावे उपस्थित होते. दरम्यान, 'चंद्रकांत पाटील यांना भीक, लोकवर्गणी व देणगी यांतील फरक तर कळतो का?' असा प्रश्न काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शुक्रवारी केला. 'महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील गोर-गरिबांच्या मुलांसाठी शाळा सुरू करुन शिक्षणाचे दरवाजे खुले केले. बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी या महापुरुषांनी आपल्याकडे जे होते ते सर्वस्व दिले. लोकांकडून वर्गणी, देणगीच्या स्वरूपात पैसे जमा केले व शाळा उघडल्या. या महान कार्यासाठी त्यांनी 'भीक' मागितली असे म्हणून चंद्रकात पाटील यांनी या महापुरुषांचा, त्यांनी केलेल्या महान कार्याचाच अपमान केला असे नाही तर बहुजन समाजाचाही अपमान केला आहे', अशी टीका पटोले यांनी केली.

2) लोकमत पान क्र. 2

### ऑनलाइन पद्धतीने भरू शकणार अर्ज

# हवालदार पदासाठी तृतीयपंथीही पात्र

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मुंबई :** पोलिस हवालदार पदासाठी तृतीयपंथी ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरू शकणार आहेत. त्यासाठी राज्य सरकार अर्जात सुधारणा करणार असून 'लिंग' या श्रेणीत तृतीयपंथी या पर्यायाचा समावेश करण्यात येणार आहे. अर्ज भरण्याची मुदत १५ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. तृतीयपंथी उमेदवारांच्या शारीरिक चाचणीसाठी पुढील वर्षाच्या फेब्रुवारीपर्यंत निकष ठरविण्यात येतील, अशी माहिती राज्य सरकारने शुक्रवारी उच्च न्यायालयात दिली.

पोलिस हवालदार पदासाठी सुरू असलेल्या राज्यव्यापी भरती प्रक्रियेत तृतीयपंथींसाठी स्वतंत्र पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत अपयशी ठरल्याप्रकरणी राज्य सरकारची उच्च न्यायालयाने कानउघाडणी केली होती. त्यानंतर शुक्रवारी या मुद्द्यावर मुख्य न्या. दीपांकर दत्ता व न्या. अभय अहुजा यांच्या खंडपीठापुढे पुन्हा सुनावणी झाली. त्यावेळी महाअधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी राज्य सरकार ऑनलाइन अर्जात सुधारणा करणार आहे. 'लिंग' या श्रेणीत तृतीयपंथींचाही समावेश करणार आहे. त्याशिवाय सध्याच्या भरती प्रक्रियेत तृतीयपंथीयांसाठी दोन पदे राखीव ठेवण्यात येणार आहेत, असे न्यायालयाला सांगितले.

- राज्य सरकार २८ फेब्रुवारीपर्यंत नियम तयार करेल आणि त्यानंतरच शारीरिक; लेखी चाचणी घेण्यात येईल, असा आदेश न्यायालयाने दिला.
- गृह विभागाच्या भरती प्रक्रियेत सामील होण्यासाठी भराव्या लागणाऱ्या अर्जात महिला व पुरुष, असे दोनच पर्याय असतात.
- या दोन पर्यायांबरोबर तृतीयपंथींसाठीही पर्याय उपलब्ध करावा, यासाठी दोन तृतीयपंथींनी मॅटमध्ये याचिका केली.
- त्यावर मॅटने राज्य सरकारला तृतीयपंथींसाठी पर्याय उपलब्ध करण्याचा आदेश दिला. या आदेशाला राज्य सरकारने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.
- तृतीयपंथींसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख १५ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. १३ डिसेंबरपर्यंत तिसरा पर्याय उपलब्ध करण्यात येईल.
- तर शारीरिक चाचणी निकष निश्चित केल्यानंतर घेण्यात येईल व त्यानंतरच लेखी परीक्षा घेण्यात येईल.



3) लोकसत्ता पान क्र. १०

दि. 10/12/2022

4) पुढारी पु. पान क्र. 1

# श्रद्धाच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या

## विकास वालकर यांची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** श्रद्धा वालकर हिची हत्या करणारा आरोपी आफताब पूनावालाला फाशीची शिक्षा द्यावी, तसेच आफताबच्या कुटुबीयांची चौकशी करून या प्रकरणातील दोषींविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी श्रद्धाचे वडील विकास वालकर यांनी शुक्रवारी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केली.

वसईतील श्रद्धा वालकरची (२६) प्रियकर आफताब अमीन पूनावाला (२८) याने दिल्लीत हत्या केल्याचे प्रकरण सध्या देशभरात गाजत आहे. याप्रकरणी, श्रद्धाचे वडील विकास वालकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. तसेच मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पत्रकारांसमोर व्यथा मांडली. यावेळी भाजप नेते किरीट सोमय्या उपस्थित होते.

पालकांच्या विरोधाला न जुमानता डेटिंग ॲपवर भेटलेल्या आफताबवर श्रद्धाने विश्वास ठेवला आणि ती त्याच्याबरोबर राहत होती. या घटनेला 'डेटिंग ॲप'ही जबाबदार आहे. त्यामुळे अशा 'ॲप'वर सरकारचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. तसेच १८ वर्षांनंतर मुलांना त्याचे हक्क मिळतात आणि ते पालकांना जुमानत नाहीत. मुलांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

श्रद्धा हत्याप्रकरणी दिल्लीचे राज्यपाल, दिल्लीमधील वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. तपास योग्य दिशेने सुरू आहे. माझा न्यायालयावर पूर्ण विश्वास आहे, असे विकास वालकर म्हणाले.

### दीड वर्षापूर्वी शेवटचा संवाद...

श्रद्धा माझ्याशी कधी फोनवर जास्त वेळ बोलत नव्हती. २०२१ मध्ये आमचे बोलणे झाले होते, तेव्हा ती बंगळूरूमध्ये राहात होती. त्यावेळी तिने तिच्या भावाची आणि इतरांची विचारपूस केली. त्यानंतर आमचे कधी बोलणे झालेच नाही. २३ सप्टेंबर २०२२ रोजी मी पोलिसांना भेटायला गेलो आणि माझी तक्रार ३ ऑक्टोबरला नोंदवण्यात आली. अनेक वेळा श्रद्धाच्या मित्र-मैत्रिणींकडे विचारपूस करीत होतो, परंतु काहीच उत्तर मिळत नव्हते. आफताबच्या आईकडूनही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, असे विकास वालकर म्हणाले.

### वसई पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न...

वसईतील तुळिंज आणि माणिपूर पोलिसांनी सहकार्य केले असते, तर माझी मुलगी आज जिवंत असती. पोलिसांच्या असहकार्यामुळे मला त्रास सहन करावा लागला. त्यामुळे संबंधित पोलिसांची चौकशी करणे आवश्यक आहे, असे विकास वालकर म्हणाले. दरम्यान, विकास वालकर यांनी केलेले आरोप वसई पोलिसांनी फेटाळले. आमचा तपास आणि श्रद्धाच्या अर्जावर केलेली कारवाई योग्य होती. कुठेही हलगर्जीपणा झाला नाही, असे पोलिसांनी सांगितले.

# ग्रा. पं. निवडणुकीची रणधुमाळी सुरू

**विरार :** वसईतील १५ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होत आहे. निवडणूक रिंगणात ३३८ उमेदवार असून त्यामध्ये सरपंच पदाचे उमेदवार ४६ आहेत. तर ग्रामपंचायत सदस्य पदासाठी २९२ उमेदवार लढवीत आहेत. वसई तालुक्याच्या पूर्व-पश्चिम भागातील टिवरी, खार्डी-डोलीव, टोकरे-खैरपाडा, पाणजू, पारोळ, तिल्हेर, करंजाने, नागले, मालजीपाडा, कळंब, वासळई, रानगाव, तरखड, टेंभी कोल्हापूर, खोचिवडे या ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत आहेत. या ग्रामपंचायत सदस्य ५१ प्रभागांत १४१ जागांसाठी निवडणूक होत आहे. ५२७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. छाननी मध्ये १ अर्ज बाद करण्यात आला. ४५ सरपंच व १२९ सदस्य असे एकूण १७४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता सरपंचपदासाठी ४६ व सदस्य पदासाठी २९२ असे एकूण ३३८ विविध राजकीय पक्ष व अपक्ष असे उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. १४ सदस्य बिनविरोध निवडणूक आले आहेत. १८ डिसेंबर रोजी या निवडणुका होत आहेत. निवडणूक विभाग अधिकारी व नायब तहसिलदार चंद्रकांत पवार यांनी माहिती दिली.

5) पुढारी पान क्र. 3

# वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या आरोपीस अटक

**मीरारोड :** अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत काही इसम पिडीत महिलांना वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या तीन आरोपीस अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखा, वसई यांनी अटक केली असून त्यांच्या तावडीतून पिडीत मुलींची सुटका केली आहे. अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत हॉटेल डॉल्फीन कॉटेज (तुळसाई फार्म हाउस) कळंब याठिकाणी पिडीत मुलींना पैशाचे आमिष दाखवुन त्यांना वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करून गिऱ्हाईकांकडून मिळालेले पैसे घेत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक शाखा, वसईचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून वेश्यादलाल विशाल शिवाजी हिरे याला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर विशाल शिवाजी हिरे, लॉज मालक दिलीप लक्ष्मण घरत व चालक अभिषेक बाबु चंदन यांच्याविरुद्ध अर्नाळा पोलीस ठाण्यात भा.दं.वि.सं. कलम ३७०(१) ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून २ पिडीत मुलींची वेश्या व्यवसायापासून सुटका केली आहे.

CamScanner

दि. 10|12|2022

6) पुढारी पु. पान क्र. 2

# कर्ज देण्याच्या अमिषाने दीड लाखांची फसवणूक

**मीरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर येथील एका ५६ वर्षीय व्यावसायिकाची एका प्रसिद्ध नॉन-बँकिंग वित्तीय कंपनीकडून कर्ज देण्याच्या नावाखाली १ लाख ४८ हजार ५०० रुपयांची फसवणूक करण्यात आली.

भाईंदर पश्चिम येथे राहणाऱ्या एका ग्राहकोपयोगी उत्पादनांचा व्यापार करणाऱ्याला एल अँड टी फायनान्स कंपनीतून बोलत असून आपणास कर्ज पाहिजे का अशी फोनद्वारे विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी कर्जाची आवश्यकत असल्याचे सांगितले. त्यानंतर त्या फोनद्वारे विचारणा करणाऱ्याने एका व्यक्तीला भाईंदर (पूर्व) येथील आशा नगर येथील तक्रारदाराच्या कार्यालयात कागदपत्र घेण्यासाठी पाठवले. त्यावेळी कर्ज देण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी कागदपत्रे आणि बँक स्टेटमेंटसह कागदपत्रे जमा केली. आरोपींनी नंतर कर्जाची प्रक्रिया करण्यासाठी आणि रक्कम वितरित करण्यासाठी सुरक्षा ठेव म्हणून चार क्रॉस चेक घेतले. त्यानंतर तक्रारदाराच्या बँक खात्यामधून आरोपींनी नितेश गोविंद यादव, आकाश जालींदर विनकर, नितीश गोविंद यादव असे नाव टाकून त्यामधून प्रत्येकी ४९,५०० रुपये अशी रक्कम काढली. त्यानंतर एक चेक पेमेंट थांबवण्यात आले. तीन वेगवेगळ्या नावांचा वापर करून चेकद्वारे १ लाख ४८ हजार ५०० रुपयांची फसवणूक करून काढण्यात आले. आरोपींनी तक्रारदाराच्या चेकमध्ये फेरफार करून बँकेतून रोख रक्कम काढली.

बँकेमधुन रोख रक्कम काढून त्या दोन इसमांनी धनादेशामध्ये खाडाखोड करुन फसवणूक केली. हे समजताच तक्रारदार यांनी फोन करणारा विशाल व कागदपत्र घेण्यासाठी आलेला अमीत यांच्या विरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तपास पोलीस करत आहेत. व्यवहार करतांना खोट्या आमिषांना बळी पडू नका, असेही पोलीसांनी सांगितले.

7) लोकसत्ता पान क्र. 16

# बुलेट ट्रेन प्रकल्पातील वृक्षतोडीला विरोध

## विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा विनाश सुरू असल्याचा आरोप

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात अडथळा निर्माण करणारे वृक्ष तोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, मात्र या वृक्षतोडीला वसईतील पर्यावरणप्रेमींनी विरोध दर्शविला आहे. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा विनाश सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

हा प्रकल्प वसई-विरारच्या भागातून जात आहे. या प्रकल्पात गोखिवरे, बिलालपाडा, मोरे गाव, ससूनवघर या गावांतील एक हजार ३६८ झाडे यात बाधित होत आहेत. यामध्ये अगस्त, ऐन, आंबा, आपटा, बाबूल, बेल, अमाती, बेहडा, भेंड, चिंच, चारकोल, बदाम, बोर, कडुनिंब, जांभूळ, आवळा, काजू, काकड, खैर, निलगिरी, पिंपळ, खजूर, कांचन, काळा उंबर, सुपारी, ताड, नारळ, सोनमोहर अशा विविध प्रजातींच्या वृक्षाचा समावेश आहे. वृक्षप्राधिकरण विभागाने जाहिरात प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविल्या आहेत. त्यानुसार पर्यावरणप्रेमींनी हरकत दाखल केली आहे. सध्या पर्यावरणाचा ऱ्हास सुरू आहे, असे असताना त्याचे संवर्धन गरजेचे आहे, असे पर्यावरण संवर्धन समितीचे समीर वर्तक यांनी म्हटले आहे.

### पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल चुकीचा

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भात पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल तयार केला होता. मात्र तयार केलेला अहवाल बोगस असल्याचा आरोप समीर वर्तक यांनी केला आहे. हा फसवणूक करणारा अहवाल आम्ही जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सीला चार वर्षांपूर्वी कळविला होता. त्यानंतर त्यांचे प्रतिनिधी आम्हास भेटण्यासाठी आलेले होते. आम्ही दिलेल्या माहितीच्या आधारे आणि त्यांनी केलेल्या चौकशीमुळे आजपर्यंत या प्रकल्पासाठी देण्यात येणारे कर्ज मिळालेलेच नाही. त्यामुळे हा प्रकल्प पूर्ण होणार की नाही हीच शंका असताना वृक्षतोड करणे हेच अनधिकृत, असे वर्तक यांनी सांगितले आहे.

CamScanner

८) पुढारी पृ. पान क्र. 2

दि. 10/12/2022

# पोलीस आयुक्तांसह पुरातत्त्व विभागाच्या संचालकांना समन्स

## चौक येथील जंजिरे धारावी किल्ल्यातील मद्यपींच्या उपद्रवाची दखल

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील चौक परिसरात नामशेष झालेल्या जंजिरे धारावी किल्ल्याला पालिकेसह राज्य शासन, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नवसंजीवनी दिली जात आहे. मात्र या किल्ल्यात काही मद्यपींनी उच्छाद मांडला असून ते किल्ला परिसरात सर्रास दारूच्या पार्ट्या झोडून दारूच्या रिकाम्या बाटल्या तसेच सिगारेट्सची पाकिटे तेथेच टाकून पळ काढतात. त्याचे वृत्त विविध प्रसार माध्यमांनी प्रसिद्ध केले असता त्याची दखल राज्य मानव आयोगाकडून घेण्यात आली आहे. आयोगाने याप्रकरणी स्यूमोटो दाखल करून घेत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त तसेच राज्याच्या पुरातत्व विभागाच्या संचालकांना समन्स बजावून १३ जानेवारी २०२३ पर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

चौक येथील जंजिरे धारावी किल्ल्याचा वापर धाकटे पेशवे चिमाजी आप्पा यांनी वसई किल्ल्यावरील चढाईकरीता केला होता. याद्दष्टीने या किल्ल्याला ऐतिहासिक वारसा लाभला असताना त्याच्या संवर्धनाकडे मात्र कोणीही लक्ष दिले नाही. परिणामी हा किल्ला नामशेष झाला असताना काही दुर्गप्रेमींनी या किल्ल्याच्या संवर्धनसासाठी राज्याच्या पुरातत्व विभागाकडे पत्रव्यवहार केला. त्यावर पुरातत्व विभागाने हा किल्ला राज्याच्या संरक्षित स्मारकाच्या यादीत नसल्याचे सांगून त्याच्या संवर्धनासाठी नकार दिला. तरीदेखील या किल्ल्याचे संवर्धन व्हावे, यासाठी काही दुर्गप्रेमींनी आपली जिद्द न सोडता किल्ला परिसर स्वच्छ करण्याची मोहीम सुरु ठेवली. त्याची दखल घेत पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात किल्ल्याच्या संवर्धनासाठी तरतूद केली. तसेच राज्य शासनासह, जिल्हाप्रशासन व विविध लोकप्रतिनिधींनी निधी उपलब्ध करून दिला. या किल्ल्याचे पावित्र्य राखले जावे, त्यात कोणतेही अनैतिक प्रकार घडू नये, यासाठी पालिकेने किल्ला परिसरात सुरक्षा रक्षकाची नियुक्ती केली. मात्र काही मद्यपी तसेच धूम्रपान करणाऱ्यांनी किल्ला परिसरात दारूच्या पार्ट्या झोडण्यास सुरुवात करीत तेथेच दारूच्या रिकाम्या बाटल्या टाकून किल्ल्याच्या पावित्र्याला धक्का लावण्यास सुरुवात केली.

### खंडपीठाने स्यूमोटो दाखल करून घेतले

वृत्त प्रसिद्ध होताच राज्य मानव आयोगाने त्याची दखल घेत आयोगाचे न्या. के. के. तातेड व सदस्य भगवंतराव मोरे यांच्या खंडपीठाने स्यूमोटो दाखल करून घेत १६ नोव्हेंबर रोजी राज्याच्या नगरविकास विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना नोटीस बजाविली. त्यात त्या प्रकरणाची चौकशी करून त्याचा अहवाल १३ जानेवारी २०२३ पर्यंत सादर करण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे ८ डिसेंबर रोजी मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तांसह राज्याच्या पुरातत्व विभागाच्या संचालकांना १३ जानेवारी २०२३ पूर्वी प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी समन्स बजाविल्याने नामशेष झालेल्या किल्ल्याची चर्चा त्याच्या संवर्धनासह चांगलीच रंगू लागली आहे.

९) पुढारी पृ. पान क्र. 2

# घरफोडी करणाऱ्या महिलेस अटक

## ७ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

अचोळे पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करणाऱ्या महिलेला आचोळे पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली असून तिच्याकडून ७ लाख २० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिव्या सुरेश पटेल यांच्या राहत्या घरात कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरातील १ लाख किंमतीचे सोन्याचे दागिने व ८,३६,००० रु. रोख रक्कम अशी ९,३६,००० रुपयाच्या मुद्देमालाची चोरी केल्याची तक्रार आचोळे पोलीस ठाण्यात दिली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्ह्याच्या घटनास्थळावरील तसेच आजुबाजुचे परीसरातील १०० हून अधिक सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले. परंतु, गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने काही माहिती मिळत नव्हती.

त्यानंतर तक्रारदार व राहत असलेल्या बिल्डींगमधील रहिवाशांकडे चौकशी करून संशयित इसमांच्या मोबाईल क्रमांकावरून आरोपी कुमारी हर्षीता उदयशंकर गुप्ता, वय २३ वर्षे व्यवसाय गृहिणी हिला ताब्यात घेण्यात आले. तिच्याकडे चौकशी केली असता तिने तिचा मित्र विधीसंघर्ष बालक याच्या मदतीने ही चोरी गुन्हा केल्याचे सांगितले. त्या महिलेला बुधवारी अटक करुन तिच्याकडून गुन्ह्यात चोरी केलेले ४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, चोरीच्या रक्कमेतून खरेदी केलेला आयफोन, मोटर सायकल, फर्निचर, फ्रिज अशा महागड्या वस्तु तसेच ४,३०,००० रुपये रोख रक्कम असा एकूण ७,३०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

CS CamScanner